**जाब देणार क्र. 1 ची साक्ष**

**<u>शपथेवर सुरु...</u>**

**<u>जाब देणार क्र. 1 ची शपथेवर पुढील सरतपासणी – जाब देणार क्र. 1 चे श्री. वाय. आय. ठोले वकील यांच्यामार्फत :</u>**

01. मी निशाणी **<u>नि. सी–14</u>** वर पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये लिहलेला मजकूर बरोबर आहे व त्याखाली माझी सही आहे.

**<u>जाब देणार यांची शपथेवर उलटतपासणी – श्री. बाळू शिंदे वकील श्री. बी. आर. कावरे वकील यांच्याकरिता तक्रारदारातर्फे :</u>**

02. आमची कंपनी ईंफ्रास्ट्रक्चर पुरविण्याचे काम करते. हे म्हणणे खरे आहे की, टॉवर उभारण्याकरिता जमीन लिजवरती घेणे, टॉवरची उभारणी करणे व सदर टॉवरचा मेंटेनंस करणे ही कामे इंडस टॉवर यांना करावी लागतात. हे म्हणणे खरे नाही की, हे काम इंडस टॉवरचे प्राथमिक काम आहे. साक्षीदार सांगतो की, सदर काम इंडस टॉवरचे एक महत्वाचे काम आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर टॉवरच्या मेंटेनंसकरिता आम्हाला तंत्रज्ञांची गरज असते. हे म्हणणे खरे नाही की, आमचे हे काम सततचे काम आहे. आम्ही सदरचे काम 2008 पासून करतो.

03. लक्ष्मण बहिर यांना 2011 साली नियुक्त करण्यात आले होते याबद्द्ल मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतो की, तो त्यांचा कामगार नाही. हे मला माहिती नाही की, आम्ही त्याला पांडव ईलेक्ट्रीकलच्या नावाने दि. 01/12/2011 ते 30/06/2012 या कालावधीत कामावर ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की, तो आमच्या देखरेखीखाली व आमच्या सुचनेनुसार काम करत होता. वर्ष 2008 ते 2012 च्या दरम्यान आम्ही कोणता कॉन्ट्रॅक्टर ठेवला होता याची मला माहिती नाही. टिमलिज सोबतचे आमचे ॲग्रीमेंट 2012 साली झाले. सदर करारानुसार आम्हाला ज्या कामाची आवश्यकता असेल ते काम करण्याकरिता आम्हाला माणसं पुरवण्याची जवाबदारी टिमलिजवर देण्यात आली होती. सदर करारात कोणत्या प्रकारचे काम

करायचे आहे याची नोंद नव्हती. टिमलिजकडून पुरवण्यात आलेल्या कामगारांना आम्ही औरंगाबाद व औरंगाबादच्या जवळ असलेल्या ठिकाणी काम देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कामगारांना प्रशिक्षण दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कामगारांना प्रमाणपत्र ईश्यु केले होते. हे म्हणणे खरे नाही की, कामगारांना आमच्या ईन्स्टीटयुटमध्ये ट्रेनिंग देण्यात आले होते. आम्ही कर्मचा–यांना ॲप्रेसिएशन लेटर दिले होते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कामगारांना ओळखपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार हा आमच्याकडे तंत्रज्ञ म्हणून काम करत होता. आम्ही टिमलिजचे कॉट्रॅक्ट लेबर ॲक्टप्रमाणे रजिस्ट्रेशन केले होते. हे म्हणणे खरे आहे की, कॉट्रॅक्टर नियुक्त झाल्यावर त्यांना लायसन्सची गरज असते. हे म्हणणे खरे आहे की, लायसन्स मिळण्याकरिता फॉर्म क्र. 5 दयावा लागतो. सक्षम प्राधिकारी यांनी रजिस्ट्रेशनमध्ये कामाचे स्वरूप काय म्हणून केले होते हे मला रजिस्ट्रेशन पाहून सांगता येईल. मी रेफरन्समध्ये सदर रजिस्ट्रेशन दाखल केले आहे. सदर रजिस्ट्रेशन मी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर रजिस्ट्रेशनप्रमाणे आम्ही तंत्रज्ञांची नियुक्ती ही कॉन्ट्रॅक्टरमार्फत करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, रजिस्ट्रशनप्रमाणे आम्ही फक्त सुरक्षा रक्षकांची नियुक्ती कॉन्ट्रॅक्टदारांमार्फत करू शकतो.

04. हे म्हणणे खरे आहे की, जाब देणार क्र. 2 टीमलिंज हे 2012 ते सप्टेंबर 2017 या कालावधीमध्ये सामनेवाला क्र. 1 यांच्याक डे कंत्राटदार म्हणून काम पाहात होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार क्र. 1 हे सामनेवाला क्र. 2 यांच्याकडे काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार क्र. 1 यांनी 2016 साली डिमांड नोटीस सामनेवाला क्र. 1 व 2 यांना पाठवलेली होती. हे मला सांगता येणार नाही की, सदर डिमांड नोटीस 03/09/2016 रोजी पाठवलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर डिमांड नोटीसमध्ये तक्रारदार क्र. 1 यांची परमानंट करण्याची मागणी होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार व सामनेवाला यांच्यामध्ये समेट न झाल्यामुळे

प्रस्तुतचा संदर्भ आयडीए न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. हे मला माहिती नाही की, आज रोजी सामनेवाला क्र. 1 कडे कोणते कंत्राटदार काम करत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सप्टेंबर 2017 पर्यंत तक्रारदार क्र. 1 सामनेवाला क्र. 2 यांच्याकडे कंत्राटी कामगार म्हणून कामाला होता. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार क्र. 1 यांना नंतर दुस–या कंत्राटदाराच्या रोलवर घेतलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार क्र. 1 यांना कामावर कायम ठेवायचे आहे किंवा नाही त्याबाबत न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, कराराचा कालावधी संपल्यामुळे संपुष्टात आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारदार क्र. 1 दि. 31/12/2021 पर्यंत सामनेवाला क्र. 1 कडे काम करत होता. हे म्हणणे खरे नाही की, दि. 01/01/2022 रोजी तक्रारदार क्र. 1 यांना सामनेवाला क्र. 1 यांनी तोंडी आदेशाद्वारे (टर्मीनेशन) कामावरून काढून टाकलेले आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, तक्रारदार क्र. 1 हे आमचे कामगार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, 2017 पर्यंत तक्रारदार क्र. 1 चे सामनेवाला क्र. 1 प्रिंसीपल एम्प्लॉयर होते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला क्र. 1 हे 2017 पर्यंत प्रिंसीपल एम्पलॉयर होते त्यामुळे सर्व्हिस कंडीशन्स चेंज करण्यापुर्वी न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक होते. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, न्यायालयाची परवानगी घेण्याची आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाची परवानगी न घेतल्यामुळे सामनेवाला क्र. 1 यांनी बेकायदेशीरपणे टर्मीनेट केल्याची कारवाई केलेली आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.03.07 15:29:11 +0530

औरंगाबाद
दि. 06/03/2026

(डी. एस. खेडेकर)
न्यायाधीश
कामगार न्यायालय–1, औरंगाबाद